# ई-निविदा (eTender)
## ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर
## ता.बिलोली जि.नांदेड

================================================================================

### सौर उर्जेवर आधारित सोलर ईनव्हरटर पथदिवे खरेदी करणे करिता
### ई निविदा सुचना क्र.-१ (Notice Inviting e-Tender)

ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर ता.बिलोली जि.नांदेड साठी १४ वा वित्त आयोग अंतर्गत सन २०१७-१८ च्या आराखडयात प्रस्तावित **आरोग्य उपकेंद्रासाठी सौर उर्जेवर आधारित सोलर ईनव्हरटर (संबधित आवश्यक साहित्य)** पुरवठा करणे व बसविण्यासाठी पात्र इच्छुक पुरवठादारांकडून दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत असून त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | पासून | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1) | ई-निविदा संकेतस्थरावर उपलबध असण्याचा कालावधी | ०८/०५/२०२० | .०० | १४/०५/२०२० | ०६.५५ |
| 2) | निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | ०८/०५/२०२० | .०० | १४/०५/२०२० | ०६.५५ |
| 3) | पुरवठारांनी Online निविदा भरण्याचा व सादर करण्याचा कालावधी | ०८/०५/२०२० | .०० | १४/०५/२०२० | ०६.५५ |
| 4) | सादर केलेल्या निविदेतील लिफाफा क्र-१ (तांत्रिक)उघडण्याचा दिनांक व वेळ | १५/०५/२०२० | १०.०० | - | - |
| 5) | वाणिज्य लखोटा (लिफाफा क्र.२) उघडण्याचा दिनांक व वेळ | १५/०५/२०२० | १०.३० | - | - |

**अटी व शर्ती**

1) सदरील संपुर्ण निविदा प्रक्रिया Online पध्दतीने संगणकीय होईल. सदर निविदे संदर्भातील आवश्यक ती सर्व (नोटीस,निविदा प्रपत्रे, अटी व शर्ती, शुध्दीपत्रके इत्यादी)माहिती http//mahatenderes.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
2) ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छुक निविदाधारकास डिजीटल सिंग्नेचर सर्टिफिकीट, युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.
3) निविदेची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी लागेल. इसारा रक्कम भरण्यापासून सुट प्रमाणपत्र ग्राहय राहणार नाही.
4) निविदाधारक हा स्वतः उत्पादक किंवा अधिकृत वितरक असला पाहिजे व तसे नोंदणी प्रमाणपत्र,फर्मचे/ मालकाचे पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, मागील वर्षाचे इन्कम टॅक्स भरल्याचे प्रमाणपत्र, १५ लाखाची सालवंशी इत्यादी दस्तऐवज Scan करुनUpload करावेलागतील.
5) निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील वतसेच रु. १००/- च्या बॉन्डवर प्रतिज्ञा करुन दयावे लागेल व ते Scan करुनUpload करावेलागतील.
6) भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा तसेच आवश्यकतेनुसार Power of Attorney जोडणे बंधनकारक राहील.

कृपया मागे पहा

7) निविदेसोबत Upload केलेल्या कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रती दिनांक १५/०५/२०२० या दिवशी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायतस्तरावर ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांचेकडे समक्ष सादर करावयाचे आहेत. जे निविदाधारक कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रती समक्ष सादर करणार नाहीत ते निविदाधारक निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास पात्र राहणार नाहीत.

8) कोणतेही कारण नदेता ई-निविदा नाकारण्याचा किंवा सर्व निविदा प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार ग्रामपंचायत कार्यालयाने राखून ठेवला आहे.

9) प्राप्त/उपलब्ध निधिनुसार वरील कामाची देयके अदा केली जातील. त्याचप्रमाणे शासनाच्या नियमानुसार देयकातून विविधी कपाती कपात केल्या जातील.

10) सदरील कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्त दराने भरता येणार नाहीत.

**स्वाक्षरीत/-**
**ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर**
**ता.बिलोली जि.नांदेड**

# ई-निविदा (eTender)
# ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर ता.बिलोली जि.नांदेड

=================================================================

## सौर उर्जेवर आधारित सोलर ईनव्हरटर पथदिवे खरेदी करणे करिता
## ई निविदा सुचना क्र.-१ (Detailed Tender Notice Inviting)

ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर ता.बिलोली जि.नांदेड साठी १४वा वित्त आयोग अंतर्गत सन २०१७-१८ च्या आराखडयात प्रस्तावित **आरोग्य उपकेंद्रासाठी सौर उर्जेवर आधारित सोलर ईनव्हरटर (संबधित आवश्यक साहित्य)** पुरवठा करणे व बसविण्यासाठी पात्र इच्छुक पुरवठादारांकडून दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत असून त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम (रुपयात) | निविदा अधिग्रहीत (Download) करावयाची रक्कम रुपयात |
|---|---|---|---|---|
| 1) | ग्रामपंचायत,माचनूर ता.बिलोली जि.नांदेड सौर उर्जेवर आधारित सोलर ईनव्हरटर (1.5 Kw) (संबधित आवश्यक साहित्य). | २,२०.०००/- | २,२००/- | १००/- |

**सर्वसाधारण अटी व शर्ती –**

1) संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया Online पध्दतीने संगणकीय (Computerized) http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर खालील प्रमाणे होईल.
   - ई-निविदा दिनांक ०८/०५/२०२० ते १४/०५/२०२० रोजी सकाळी .०० ते ०६.५५ या कालावधीत http/mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असतील.
   - निविदा प्रक्रियेतील दस्तऐवज,नोंदणी प्रमाणपत्र व पुरवठाराचे/फर्म चे पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, मागील वर्षाचे इन्कम टॅक्स भरल्याचे प्रमाणपत्र, १५ लाखाची सालवंशी प्रमाणपत्र, निविदाधारकास अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र आणि निविदा फी व इसारा रक्कम भरणा केलेली पावती Scan करुन ती Online पध्दतीने लिफाफा क्र.1 मध्ये Upload करावी लागेल.
   - पुरवठादाराने निविदा भरतांना निविदासोबत वरील Upload केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा स्वतंत्र लिफाफा तयार करुन तो दिनांक १५/०५/२०२० रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या कालावधीत ग्रामपंचायतस्तरावर ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांचेकडे सादर करावा लागेल.
   - पुरवठादाराने सादर केलेल्या ई-निविदा (तांत्रिक लिफाफा क्र.1) दिनांक १५/०५/२०२० रोजी १०.०० वाजता उघडण्यात येतील.
   - वाणिज्य लखोटा (लिफाफा क्र.2) शक्य झाल्यास दिनांक १५/०५/२०२० रोजी दुपारी १०.३० वाजता उघडयात येईल. लिफाफा क्रमांक 1 मधील दस्तऐवज पूर्ण नसल्यास लिफाफा क्रमांक 2 उघडण्यात येणार नाही.
2) सदर निविदा प्रपत्र Download करावयाची किंमत रक्कम रु.१००/- (अक्षरी-शंभर रुपये फक्त) व कामासाठीची इसारा रक्कम रु. /- (अक्षरी- रुपये फक्त)Online पध्दतीने ग्रामपंचायतीच्या खात्यावर भरणा करावी लागेल. online सुविधा नसल्यास ग्रामपंचायत माचनूर ता. बिलोली ह्या नावे डिमांड ड्राफ्ट (डी.डी) काढून लिफाफा १ मध्ये जोडावी व त्याची प्रत दिनांक १५/०५/२०२० रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या कालावधीत ग्रामपंचायतस्तरावर ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांचेकडे सादर करावा लागेल

3) ई-निविदा सादर करणा-या पुरवठादारांकडे खालील पात्रता असली पाहिजे.

- पुरवठादार हा स्वतः उत्पादक किंवा त्याला उत्पादकामार्फत सदर साहित्याचा पुरवठा करण्यासाठी प्रमाणीत केलेले असले पाहिजे.
- पुरवठादार उत्पादक असल्यास त्सासाठी जिल्हा उद्योगकेंद्राकडून लघु उद्योगाचे (Small Scale Industries)नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- पुरवठादार वितरक असल्यास उत्पादकाने अधिकृत वितरक असल्याबाबत प्रमाणित (Authorization) केले असणे किंवा अधिकार पत्र असणे आवश्यक आहे.
- पुरवठादार हा वितरक असेल त्यास शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- पुरवठादाराचे/फर्मचे पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.
- जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
- मागील वर्षाचे इन्कम टॅक्स भरल्याचे प्रमाणपत्र (Income Tax Returns)
- पुरवठादारांकडे 15 लाखाचे सालवंशी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- भागीदारी संस्था असल्यास भागीदारी कारनामा तसेच आवश्यकतेनुसार Powerof Attorney असणे आवश्यक आहे.
- पुरवठादार/फर्म यांना शासकीय कार्यालयास (ग्रामपंचायत/विविध शासकीय कार्यालय) यांना कमीत कमी १ कोटी रुपयाचे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

4) उत्पादक कंपनीस ISO 9001:2008 गुणवत्ता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

5) इसारा रक्कम (**Earnest Money**

- सदर कामासाठी निविदा रक्कमेच्या 1% दराने इसारा रक्कम म्हणून पुरवठादारकास ग्रामपंचायतीच्या खात्यावर Online द्वारे जमा करावी लागेल.
- जे निविदाधारक या निविदेसाठी अपात्र ठरतील त्यांची अनामत रक्कम निविदा प्रक्रियापूर्ण झालेल्या दिनांकपासून 30 दिवसात परत करण्यात येईल.
- पात्र निविदाधारकाची ईसारा रक्कम नापरतावा असेल.

6) सुरक्ष ठेव (Security Deposit)

- निवड झालेल्या ज्या निविदाधारकाने अंदाजपत्रकीय किंमतीच्या 10% (Upto 10% below estimated cost) पर्यंत कमी किंमतीने निविदा सादर केली असल्या 4% व अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त (More than 10% below of estimated cost)कमी किंमतीने निविदा सादर केली असल्यास खरेदी आदेशाच्या 8%रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ग्रामपंचायतीचे नांवे FD (Fixed Deposit)द्वारे करारनामा करतेवळी जमा करावी लागेल.
- निविदाधारकाने विहीत कालावधीत सुरक्षा ठेव भरण्यास असमर्थता दर्शविल्यास किंवा सुरक्षा ठेव न भरल्यास संबधीताची इसारा रक्कम जप्त करुन दुस-या न्युनतम निविदाधारकास पुरवठा आदेश देण्यात येईल. किंवा ग्रामपंचायत कार्यालय योग्य तो निर्णय घेईल व तो पुरवठादारकास बंधनकारक राहील.
- सुरक्षा ठेव ही दोष-उणीवा दायीत्व कालावधीत (Defect Liability Period) संपल्यानंतर परत केली जाईल. या रक्कमवेर निविदाधारकास कसल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

7) पुरवठा करावयाच्या साहित्याची हमी ही तीन वर्षाची असणे आवश्यक आहे.

8) पुरवठादार/उत्पादकाकडे उद्योग,उर्जा व कामगार विभागकडून देण्यात येणारी अनुज्ञाप्ती असणे आवश्यक आहे,जर संबधीत पुरवठादार/उत्पादकाकडे सदरील अनुज्ञाप्ती नसेल तर किमान त्याचे भागीदार संस्था/पुरवठादार यांचेकडे असणे आवश्यक आहे.

9) पुरवठा करण्यात आलेल्या प्रत्येक लाईटचा Thermal Analysis Report असणे बंधनकारक आहे.(आवश्यकता असल्यास)

10)पुरवठा करण्यात येणारे Light हे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेले असावे. .(आवश्यकता असल्यास)

11)पात्र निविदाधारकास वर दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या रक्कमेची सुरक्षा ठेव व निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच पुरवठा आदेश पूर्ण करण्याबाबतचा रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर करारनामा 8 दिवसाचे आत करुन दयावा लागेल.

12)पुरवठा आदेश दिल्यानंतर किमान १५ दिवसाचे आत सदरील साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

13)पुरवठा केलेल्या साहिळत्याचा दोष-उणिवा दायित्व कालावधी (Defect Liability Period) हा 3 माहिण्याचा असेल. पुरवठा केलेले साहित्य सुरळीतपणे चालणे आवश्यक आहे. सदर साहित्याची देखभाल व दुरुस्ती अभावी बद पडले व पुरवठाराने ते चालू केले नाही तर पुरवठादाराचे सुरक्षा ठेवतीतून साहित्य दुरुस्त केल्या जाईल.

14)नैसर्गिक आपत्ती किंवा इतर अपवादत्मक परिस्थितीत पुरवठादारास विहीत कालावधीत काम पूर्ण करणे शक्य झाले नाहीतर पुरवठादाराचे लेखी विनंतीनुसार या कामासाठी मुदतवाढ दिली जाईल.

15)सदर साहित्याचा पुरवठा हा ग्रामपंचायतस्तरावर करावा लागेल. पुरवठा करावयाच्या दरातच वाहतुकीचा खर्च,साहित्याची उभारणी करावयाचा खर्च, शासकीय व इतर कर इत्यादीचा समावेश करावा.

16)निधीवितरण- साहित्याचा पुरवठा व उभारणी झाल्यापासून १५ दिवसाचे आत ई-निविदेतील मान्य दरानुसार देयक अदा करण्यात येईल.

17)निविदाधारकांना कोणताही पुर्व सुचना/कारण न देता कोणतीही ई-निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा किंवा सर्व निविदा प्रक्रिया स्थगित करण्याचा अधिकारी ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

18)सदरील निविदे संदर्भात काही वाद-विवाद निर्माण झाल्यास तो मा.मुख्य कायकारी अधिकारी,जि.प. यांचे समक्ष नेण्यात येईल व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

**स्वाक्षरीत/-**
**ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कार्यालय,माचनूर**
**ता.बिलोली जि.नांदेड**

Signature Not Verified
Digitally signed by ANJANA RAJU YADKE
Date: 2020.05.08 15:28:32 IST
Location: Maharashtra-MH